रविवार, दि. १९ जुलै २०१५
3
गोवन वार्ता

# लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात विवेक वाहिनीची स्थापना

वार्ताहर
गोवन वार्ता



राजेश नाईक



विद्या धर्णे

**दोडामार्ग** : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात विवेक वाहिनीची स्थापना करण्यात आली. या वाहिनीच्या प्रमुखपदी राजेश नाईक तर विद्यार्थिनी प्रमुखपदी विद्या धर्णे हिची निवड करण्यात आली. या वाहिनीचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.

विवेक वाहिनीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करून त्यांना विवेकी विचारी बनविणे, वाचन संस्कृती विकसित करणे, कलागुणांना चालना देणे, विद्यार्थ्यांना किमान एक तरी वैज्ञानिक प्रयोग शिकवणे व अंधश्रद्धा दूर करणे हा या वाहिनीचा प्रमुख उद्देश आहे. त्याचबरोबर वर्षा सहली, वादविवाद स्पर्धा, भाषण स्पर्धा आदींचे आयोजन करून या मुलांच्या वक्तृत्व गुणांना प्रोत्साहन देण्याचाही वाहिनीचा प्रमुख उद्देश राहणार असल्याची माहिती अध्यक्ष डॉ. पाटील यांनी केली. या वाहिनीच्या कार्याध्यक्षपदी प्रा. डॉ. टी. डी. गाथाडे, प्रा. श्रीपाद पाडगावकर यांची निवड करण्यात आली असून सदस्यपदी स्वाती कुबल, अंकिता कुबल, शुभम धुरी, देविता पावसकर, निकीता नाईक यांची निवड जाहीर करण्यात आली.